# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २५४/२०२४

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय : अध्यापक पदभरती करताना दिव्यांगाकरिता समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत...**

**संदर्भ : उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे परिपत्रक क्र. संकिर्ण २०२४/ ई ७२२५५०/विशि-१, दि. २९.०१.२०२४**

उपरोक्त विषय व संदर्भिय शासन परिपत्रकान्वये अध्यापक पदभरती करताना दिव्यांगाकरिता समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर शासन परिपत्रकाची प्रत यासोबत अवलोकनार्थ जोडण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकामधील कलम २ मध्ये पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.
"सामान्य प्रशासन विभागाकडून पदभरतीकरिता सामाजिक आरक्षण तपासून देण्यात येते. समांतर आरक्षणासंदर्भात संबंधित विभागाच्या स्तरावर खातरजमा करावी. अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाकडून देण्यात आलेल्या आहेत. उच्च शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात संबंधित विद्यापीठ हे नियुक्ती प्राधिकारी आहेत. तसेच, अनुदानित महाविद्यालयाच्या संदर्भात संबंधित महाविद्यालयाचे संचालक मंडळ हे नियुक्ती प्राधिकारी आहेत. यास्तव, "पदभरती करताना The Rights or Persons with Disabilities Act, २०१६ (RPwD Act, २०१६) मधील तरतुदी, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २९.०५.२०१९ शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती आणि दि. २५.०१.२०२४ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी करून दिव्यांगांकरिता नियमानुसार पदे आरक्षित ठेवावी," असे सर्व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना याद्वारे कळविण्यात येत आहे."

सदर शासन परिपत्रकास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, शासनाने समांतर आरक्षणासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/परिपत्रके विचारात घेऊन त्यामध्ये नमुद करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार समांतर आरक्षणाबाबत संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील नियुक्ती प्राधिकारी यांनी काटेकोर अंमलबजावणी करावी.

**गणेशखिंड, पुणे-४११००७ )**
**जा. क्र. :आरक्षण/**ओ-२२/२०७ **)**
**दिनांक:** १८/१०/२०२४ **)**

१८/१०/२४
**प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-**

१. मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था पुणे, अहमदनगर व नाशिक
   - सदरहू परिपत्रक संबधितांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.

२. उपकुलसचिव, शैक्षणिक (मान्यता) विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
३. उपकुलसचिव, प्रशासन शिक्षक व शिक्षकेतर कक्ष.
४. मा. संचालक, नाशिक उपकेंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
५. मा. संचालक, अहमदनगर उपकेंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
६. कार्यालयीन संचिका

अध्यापक पदभरती करताना दिव्यांगांकरिता समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**क्र. संकिर्ण २०२४/ ई ७२२५५० /विशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २९ जानेवारी, २०२४.

**वाचा:-** १) संचालक उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.उशिस/२०२३/दिव्यांग आरक्षण/मवि-१/ १४६२४, दि.१५.१२.२०२३.
२) संचालक उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२३/ई ७१५७७०/विशि-१, दि.३.१.२०२४.
३) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांम राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ दि.२५ जानेवारी,२०२४

**परिपत्रक:-**

" उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये अनुदानित सहाय्यक प्राध्यापकांची भरती करताना दिव्यांगांकरिता समांतर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. तसेच, बहुतेक महाविद्यालयांमध्ये अद्याप दिव्यांग उमेदवाराची भरती करण्यात आली नाही." अशा स्वरूपाच्या तक्रारी मा. न्यायाधिकारी तथा आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीसंदर्भात मा. न्यायाधिकारी तथा आयुक्त, दिव्यांग कल्याण यांनी सुनावणी घेतली असून दि. ०७.१२.२०१३ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत:-

अ) अर्जदार यांचा तक्रार अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

आ) The Rights of Persons with Disabilities Act २०१६ (RPwD Act) Section ३४ अन्वये सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या दि. २९.०५.२०१९ च्या दिव्यांगांच्या समांतर आरक्षणाच्या धोरणाची निवड समितीने तंतोतंत व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी उच्च तंत्र शिक्षण विभागाकडे आवश्यक तो प्रस्ताव दि. १५.१२.२०२३ रोजीपर्यंत सादर करावा.

इ) प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांचे स्तरावरून संबंधित विद्यापीठे, महाविद्यालये व सदर विभागाच्या अंतर्गत येत असलेल्या सर्व निवड समित्यांना दिव्यांगांच्या समांतर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यासाठी परिपत्रक ०३ महिन्याच्या आत निर्गमित करावे.

०२. प्रस्तुत प्रकरणी नमूद करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाकडून पदभरतीकरिता सामाजिक आरक्षण तपासून देण्यात येते. समांतर आरक्षणासंदर्भात संबंधित विभागाच्या स्तरावर खातरजमा करावी, अश्या सूचना सामान्य प्रशासन विभागाकडून देण्यात आल्या आहेत. उच्च शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात संबंधित विद्यापीठ हे नियुक्ती प्राधिकारी आहे. तसेच, अनुदानित महाविद्यालयांच्या संदर्भात संबंधित महाविद्यालयाचे संचालक मंडळ हे नियुक्ती प्राधिकारी आहेत. यास्तव, "पदभरती करताना The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ (RPwD Act,२०१६) मधील

तरतुदी, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २९.०५.२०१९ शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती आणि दिनांक २५.०१.२०२४ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी करून दिव्यांगांकरिता नियमानुसार पदे आरक्षित ठेवावी," असे सर्व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना याद्वारे कळविण्यात येत आहे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०१२९१५४२०८७८०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2024.01.29 15:41:23 +05'30'

**(अजित बाविस्कर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. संचालक, कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे.
५. कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे.
६. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलगुरू, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.
८. कुलगुरू, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-नागपूर.
९. कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे.
१०. कुलगुरू, सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ,पुणे.
११. सर्व अनुदानित महाविद्यालये/ संस्था यांना संचालक,उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ कला संचालनालय यांच्यामार्फत.
१२. निवडनस्ती (विशि-१).

**राज्यात शासन सरळसेवा पदभरतीमध्ये समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : राआधो ४०२४/प्र.क्र.१४ /१६-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ जानेवारी, २०२४

**वाचा :** १) सामान्य प्रशासन विभाग, शा.परिपत्रक क्र. एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ, दि.१६.०३.१९९९
२)सामान्य प्रशासन विभाग, शा.परिपत्रक क्र. न्याप्र २००७/स.न्या./प्र.क्र.१०३(भाग-३),१६अ,दि.१९.१०.२००७
३) सामान्य प्रशासन विभाग, शा.परिपत्रक क्र. एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६ अ, दि.१३.०८.२०१४
४) सामान्य प्रशासन विभाग, शा परिपत्रक क्र. संकीर्ण १११४/प्र.क्र.२५२/१६ अ, दि.२०.०७.२०१५
५) सामान्य प्रशासन विभाग, शा.परिपत्रक क्र. संकीर्ण १११४/प्र.क्र.२५५/१६ अ, दि.३.१०.२०१६
४) सामान्य प्रशासन विभाग, शा.शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.३९/१६ अ, दि.१९.१२.२०१८
५) महिला व बाल विकास विभाग, शा.निर्णय क्र. अनाथ २०१८/प्र.क्र.१८२/का.३, दि.२३.०८.२०२१

**परिपत्रक :**

राज्यात शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरण लागू आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण असून त्याला उभे आरक्षण (Vertical Reservation) म्हटले जाते. त्याचप्रमाणे काही विशेष घटकांना सुध्दा आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्याला समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) असे म्हटले जाते.

२. सद्य:स्थितीत राज्यात शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी असलेले सामाजिक व समांतर आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे-

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ % |
| २ | अनुसूचित जमाती | ७ % |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३ % |
| ४ | भटक्या जमाती ( ब ) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (क ) | ३.५ % |
| ६ | भटक्या जमाती ( ड ) | २ % |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | १९ % |
| ९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | १० % |
| | **एकूण आरक्षण** | **६२ %** |
| | **खुला/अराखीव प्रवर्ग** | **३८ %** |

| अ.क्र. | समांतर आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | महिला | ३० % |
| २ | माजी सैनिक (फक्त क व ड च्या पदांवर ) | १५ % |
| ३ | दिव्यांग | ४ % |
| ४ | खेळाडू | ५ % |
| ५ | प्रकल्पग्रस्त (फक्त क व ड च्या पदांवर ) | ५% |
| ६ | भूकंपग्रस्त (फक्त क व ड च्या पदांवर ) | २% |
| ७ | पदवीधर अंशकालीन (फक्त क व ड च्या पदांवर ) | १०% |
| ८ | अनाथ | १% |
| | | |
| | | |
| | **एकूण आरक्षण** | **७२ %** |

३. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र.४०६७/१९९८ प्रकरणी, मा.सर्वोच्च न्यायालयाने अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर या प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयास अनुसरुन समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले. त्यानुसार संदर्भ क्र.१ अन्वये दि.१६.०३.१९९९ रोजी समांतर आरक्षणासाठी कप्पीकृत समांतर आरक्षण (Compartmental Horizontal Reservation ) धोरण लागू करण्यात आले. तद्नंतर संदर्भ क्र. २ येथील दि.१९.१०.२००७ अन्वये दिव्यांग (अपंग) व महिला व बालविकास विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील दि.२३.८.२०२१ अन्वये अनाथ या घटकास, कप्पीकृत समांतर आरक्षणाऐवजी एकूण समांतर आरक्षण धोरण ( Overall Horizontal Reservation) लागू करण्यात आले.

४. समांतर आरक्षण धोरणाची कार्यपध्दती ही या विभागाकडून दि.१६.३.१९९९ नुसार निश्चित करण्यात आली आहे. तसेच त्यात दि.१३.८.२०१४ व दि.१९.१२.२०१८ अन्वये काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. तसेच दि.३.१०.२०१६ अन्वये विशेष घटकांसाठी समांतर आरक्षण धोरण लागू करण्याबाबतची कार्यपध्दती व अंमलबजावणी यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभाग/कार्यासने घोषित करण्यात आले आहेत. (उदा. महिला व अनाथ आरक्षण हे महिला व बाल विकास विभाग, खेळाडू आरक्षण शालेय शिक्षण व क्रिडा विभाग इत्यादी.)

५. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद ४ अन्वये, समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा, अ.ज, वि.ज(अ), भ.ज(ब), भ.ज(क), भ.ज(ड), वि.मा.प्र, इ.मा.व, ईडब्ल्यूएस आणि खुला/अराखीव प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करण्याबाबत स्पष्ट नमूद केले आहे. तसेच सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी सदर कार्यध्दतीनुसार कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

६. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा दुय्यम निवडमंडळ अथवा नियुक्ती प्राधिकाऱ्यांमार्फत विहित कार्यपध्दतीने राबविण्यात येणाऱ्या सरळसेवा भरतीप्रक्रियांसाठी मागणीपत्रात **सामाजिक** आरक्ष**णाची** निश्चि**ती** योग्य प्रकारे करण्यात आली आहे किंवा कसे याबाबत मागासवर्ग कक्षांकडून तपासणी करण्यात येते. सामाजिक आरक्षण निश्चितीनंतर, समांतर आरक्षणाची गणना ही भरावयाच्या रिक्त पदांवर करण्यात येते. ज्या विशेष घटकासाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे, त्या संबंधित प्रशासकीय विभाग/कार्यासने अथवा मागासवर्ग कक्ष यांच्यामार्फत समांतर आरक्षण तपासण्यात अनावश्यक कालापव्यय टाळण्यासाठी सामाजिक आरक्षणानुसार भरावयाच्या रिक्त पदे काढून दिल्यानंतर, रिक्त पदांवर समांतर आरक्षणाच्या विहित टक्केवारीनुसार एकूण अथवा कप्पीकृत पध्दतीने समांतर आरक्षणाच्या पदांची गणना करुन, संबंधित प्रशासकीय विभाग / नियुक्ती प्राधिकारी यांनी खातरजमा करणे आवश्यक आहे. तसेच त्यानुसार मागणीपत्रात/ जाहिरातीत समांतर आरक्षणानुसार उपलब्ध पदे नमूद करणे बंधनकारक आहे.

७. समांतर आरक्षणसंदर्भातील अनुसरावयाची कार्यपध्दती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हा परिषदा/ शासकीय अनुदानप्राप्त संस्था/ विद्यापीठे / सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू आहे. तथापि, विविध न्यायालयीन प्रकरणे तसेच निवेदने या माध्यमातून समांतर आरक्षणाची पदे भरण्यात येत नसल्याबाबत अथवा समांतर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याची बाब निदर्शनास येते.

८. सदर बाब विचारात घेता, शासन या परिपत्रकान्वये शासन सेवेत सरळसेवा पदभरती करताना, सामाजिक आरक्षण निश्चितीनंतर, समांतर आरक्षणाची पदे विहित टक्केवारीनुसार आरक्षित ठेवून सदर पदांवर खालील कार्यपध्दतीनुसार पदभरती करण्याबाबत प्रशासकीय विभाग तसेच संबंधित नियुक्ती प्राधिकारी/ आस्थापना यांनी काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे. त्यानुसार समांतर आरक्षणाची पदे राखून ठेवण्याबाबत तसेच नियुक्तीबाबत खालील कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदभरती प्रक्रियांमध्ये महिला, अनाथ, दिव्यांग, माजी सैनिक, खेळाडू या आरक्षणांसाठी उक्त तक्त्यात नमूद केलेल्या प्रमाणात टक्केवारीनुसार पदे राखून ठेवावीत.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील पदभरती प्रकियांमध्ये महिला, अनाथ, दिव्यांग, माजी सैनिक, खेळाडू आरक्षणांसह प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन या घटकांसाठी उक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार पदे आरक्षित ठेवावी.

३) दिव्यांग व अनाथ आरक्षण वगळता अन्य समांतर आरक्षण घटकांसाठी कप्पीकृत समांतर आरक्षण धोरण अवलंबण्यात यावे. रिक्त पदांच्या प्रमाणात समांतर आरक्षणाच्या घटक निहाय टक्केवारीनुसार त्या त्या सामाजिक प्रवर्गात पदे राखून ठेवण्यात यावी.

४) दिव्यांग व अनाथ आरक्षणासाठी एकूण समांतर आरक्षण धोरणानुसार भरावयाच्या एकूण रिक्त पदांवर अनुक्रमे ४ टक्के व १ टक्का या प्रमाणात पदे राखून ठेवावीत. ती स्वतंत्र दर्शविण्यात यावीत. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक अथवा खुल्या प्रवर्गातील असतील त्या सामाजिक/खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात यावे.

५) समांतर आरक्षणासाठी राखीव असलेल्या जागांवर नियुक्तीसाठी खालील कार्यपध्दती अनुसरण्यात यावी-

अ) प्रथम टप्पा- खुल्या प्रवर्गातील (अराखीव पदे) उमेदवारांची गुणवत्तेच्या निकषानुसार निवड यादी तयार करावी. या यादीत खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा., भ.ज., वि.मा.प्र., इ.मा.व., ईडब्ल्यूएस) समावेश होईल. या यादीत समांतर आरक्षणानुसार उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरीता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारांपैकी आवश्यक पर्याप्त संख्येइतके समांतर आरक्षणामधील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवार घेणे आवश्यक आहे.

ब) दुसरा टप्पा- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा “अ” मध्ये सामील झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.

क) तिसरा टप्पा- वरील “ब” नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार “अ” येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

६) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत असून, सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

७) समांतर आरक्षण एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुसऱ्या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थलांतरीत करता येणार नाही. एका सामाजिक आरक्षणांतर्गत समांतर आरक्षणासाठी घटकनिहाय राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे संबंधित समांतर आरक्षण घटकासाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन, त्या त्या सामाजिक प्रवर्गात गुणवत्तेवर देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

९. शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी दिलेल्या सूचनांनुसार वरीलप्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी करावी.

१०. प्रत्येक पदभरतीवेळी भरावयाच्या रिक्त पदांवर समांतर आरक्षणातील सर्व घटकांसाठी विहित केलेल्या प्रमाणानुसार पदे दर्शविण्यात येतील याची खातरजमा नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.

११. सदर आदेश शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे / महामंडळे/ नगरपालिका/ महानगरपालिका/ जिल्हा परिषदा/ शासकीय अनुदानप्राप्त संस्था/ विद्यापीठे / सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू आहे.

**१२.** प्रस्तुत शासन परिपत्रक सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व आस्थापना / नियुक्ती प्राधिकारी /विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे व समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यात येत असल्याबाबत दक्षता घ्यावी.

**१३.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०१२५१२४८२१४६०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK MAHADEO CHEMTE

Digitally signed by ASHOK MAHADEO CHEMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=7cf579d564c1ecb1f9db8131315b3c1d75eb6e6fc9a4768960c6b38cc3519467,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9D329586BFDEB8758AC3DF2D5A4BFB2D41BEB6B6B6033B048F01BF21C4A28A7D, cn=ASHOK MAHADEO CHEMTE
Date: 2024.01.25 12:50:28 +05'30'

(अ.म.चेमटे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी /उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)/ सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२०. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७. विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

**दिव्यांग अधिनियम २०१६ अनुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण विहित करणे व आरक्षण अमंलबजावणीची कार्यपध्दती......**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादामकामा रोड
दिनांक - २९ मे, २०१९

**वाचा** :- (१) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३ मे,१९७८
(२) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०८१/प्र.क्र.१५/९९/१६-अ, दिनांक ७ सप्टेंबर, १९८२
(३) शासन निर्णय समाजकल्याण, संसकृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक इडीडी १०९० २२५९२/सिआर ४००/सुधार-२, दिनांक १९ ऑगस्ट, १९९२
(४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०९७/सीआर-२/९७/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट, १९९७
(५) शासन परिपक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र. क्र. १२/९७/१६-अ दिनांक ०२ मे, १९९८
(६) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक न्याय-२००७/प्र.क्र.१०३८(भाग ३)/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७
(७) दिव्यांगांचे अधिकार अधिनियम २०१६, दिनांक २८ डिसेंबर, २०१६
(८) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची दिनांक १५ जून, २०१७ ची अधिसूचना
(९) केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६०३५/०२/२०१७ (आस्था), दिनांक १५ जानेवारी, २०१८

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ३३ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी गट अ ते ड मधील पदावर नियुक्तीसाठी ३% आरक्षण दिनांक २ मे, १९९८ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दिनांक २०.११.१९८९ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंगासाठी गट क व ड च्या सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर पदोन्नतीसाठी ३% आरक्षण लागू करण्यात आले होते. केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ पारित केला असून अपंग व्यक्ती ( समान संधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व्यपगत झाला आहे. दिनांक १५.६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६ अंमलात आणलेले आहे. केंद्र शासनाने दिनांक १५/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगाच्या १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह

एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध ५ प्रकारांसाठी ४ % आरक्षण विहित केलेले आहे.

मंत्रिमंडळाने दिव्यांग व्यक्तींसाठींच्या महाराष्ट्र राज्य धोरणास मान्यता दिली असून त्यामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अनुसार दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या सेवेतील आरक्षणाचा समावेश आहे. त्यानुसार शासन प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

१. दिव्यांग अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार विहित प्रमाणात दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना पद आणि सेवेमध्ये आरक्षणासंदर्भात कलम २ (r) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, दिव्यांग व्यक्तींसाठी शासन सेवेत प्रवेशासाठी दिव्यांगांच्या खाली नमूद करण्यात आलेल्या पाच गटापैकी गट अ, ब, क साठी प्रत्येकी १% तसेच गट ड व इ साठी १% या प्रमाणे ४% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सरळसेवा भरतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

अ) अंध /अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायु विकृती (muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर

२. **पदांची गणना** :- गट क व गट ड मधील पदांची गणना करतांना, त्या भरती वर्षातील त्या त्या गटातील सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या संख्येवर निश्चित करावी. असे करतांना त्या त्या गटातील दिव्यांगासाठी एकाच आस्थापनेतील सुनिश्चित करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे व सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत. परंतु जेव्हा सुनिश्चित न करण्यात आलेल्या संवर्गातील पदांची संख्या मोठी राहील अशा वेळी ज्या संवर्गाची पद संख्या व रिक्त पदे कमी आहेत असा संवर्ग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घ्यावा. गट क संवर्गातील तीन विविध पदनाम असलेल्या पदावर पदभरती करावयाची असल्यास त्यातील एक पद अपंगासाठी सुनिश्चित नसल्यास उक्त पदातील रिक्त पदावरील

आरक्षणाची ४% पदे अन्य दोन संवर्गात घेण्यात यावीत.उदाहरणार्थ लिपिक, वरिष्ठ लिपिक व वनपाल अशी तीन पदावर पद भरती करतांना वनपाल पद सुनिश्चित नसल्यास, वनपाल या संवर्गाची रिक्त पदाची संख्या अन्य दोन संवर्गापेक्षा मोठी असल्यास उर्वरित दोन संवर्गातील ज्या पदाची रिक्त पदाची संख्या कमी असेल त्या संवर्गाची पदे दिव्यांग आरक्षणाची पदे निश्चित करण्यासाठी विचारात घेण्यात यावी. असे करत असताना विहित आरक्षणाचे प्रमाण ओलांडले जाईल. भरतीसाठी ७ रिक्त पदे उपलब्ध होत असल्यास त्यातील १ पद दिव्यांगासाठी आरक्षित करावे. ७ पेक्षा जास्त पदे भरतीसाठी उपलब्ध होत असल्यास विहित आरक्षणाप्रमाणे पद गणना करावी.

विहित दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींसाठी गट “अ” व “ब” च्या सरळसेवेच्या कोट्यातील पदासाठी आरक्षणाची पदे निश्चित करतांना त्या-त्या संवर्गासाठी विहित केलेल्या प्रमाणात रिक्त पदावर गणना करण्यात यावी.

तसेच एखाद्या संवर्गात / गटात दिव्यांगत्वाच्या सर्व प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली किंवा कमी प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली असली तरी जेवढ्या प्रकारांसाठी पदे सुनिश्चित केली आहेत त्यासाठीचे एकूण आरक्षण ४ % एवढेच (सरळ सेवेच्या कोट्यातील पदांवर) राहील. कमी प्रकारासाठी पदे सुनिश्चित केली म्हणून आरक्षणाचे एकूण प्रमाण कमी करण्यात येणार नाही.

३. **पद सुनिश्चितीकरणास अपवाद :-** उपरोक्त तरतुदीनुसार एखादया विभागातील पद आरक्षित करणे शक्य होणार नसल्यास याबाबतीत सूट देण्याबाबतच्या तरतुदी दिव्यांग अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार एखाद्या शासकीय विभागास वा आस्थापनेस अथवा संवर्गास त्या पदाच्या कामाचे स्वरुप व जबाबदाऱ्या विचारात घेऊन दिव्यांग व्यक्तीसाठी पद (सुनिश्चितीकरणातून) आरक्षणातून आस्थापनेवरील सर्व संवर्गासाठी किंवा काही संवर्गासाठी सूट घ्यावयाची असल्यास तसा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह व अपंग आयुक्त यांच्या शिफारशींसह संबंधीत प्रशासकीय विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या सहमतीने संयुक्तिक आदेश निर्गमित करावेत. तसेच यापूर्वी अपवाद करण्यात आलेल्या संवर्गासाठी / पदांसाठी पुन:श्च मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

४. **अनारक्षित पदावर दिव्यांग व्यक्तींची नियुक्ती :-** दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीस गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी नियुक्तीसाठी अपात्र ठरविता येणार नाही. जर दिव्यांग उमेदवारांची इतर उमेदवारांप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

५. **दिव्यांगाचे प्रमाणपत्र** - दिव्यांगाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या व्यक्तीने सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. निवड प्रक्रीये दरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान उक्त

प्रमाणपत्राची तपासणी / फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्याला राहतील. दिव्यांगाचे प्रमाणपत्र बाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

६. **वयोमर्यादा :-** दिव्यांग व्यक्तीसाठी शासन सेवा प्रवेशासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६ जून २००१ या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली कमाल वयोमर्यादा कायम ठेवण्यात येत असून ती वय वर्षे ४५ इतकीच राहील.

७. **बिंदूनामावली (रोस्टर) राखणे** :- प्रत्येक शासकीय कार्यालयाने त्यांच्या आस्थापनेवरील प्रत्येक संवर्गासाठी दिव्यांग व्यक्ती सरळ सेवा भरतीच्या पदासाठी १०० बिंदू नामावलीची स्वतंत्र नोंदवही ठेवावी. यापूर्वी ३ % आरक्षणाप्रमाणे दिव्यांग व्यक्तीसाठी बिंदू नामावलीतील बिंदू क्रमांक १, ३४ व ६७ निश्चित करण्यात आले होते. परंतु आता दिव्यांगाच्या ४ वर्गवारी असल्याने व बिंदूनामावली राखण्यास सुसूत्रता यावी म्हणून बिंदू क्रमांक १, २६, ५१ व ७६ बिंदू निश्चित करण्यात येत आहेत.

वरील बिंदूंची विभागणी खालील ४ गटात करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| गट १ | बिंदू क्रमांक | १ ते २५ |
| गट २ | बिंदू क्रमांक | २६ ते ५० |
| गट ३ | बिंदू क्रमांक | ५१ ते ७५ |
| गट ४ | बिंदू क्रमांक | ७६ ते १०० |

बिंदू क्रमांक १, २६, ५१, ७६ दिव्यांगासाठी निश्चित करण्यात येत असून, त्यावर दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्यांच्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीच्या क्रमांकावर त्यांच्या प्रवर्गानुसार त्यांचा बिंदू निश्चित होत असेल तेथे त्यांचा समावेश करण्यात यावा. एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदू पासून सुरूवात करावी. एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी.

जरी बिंदू क्रमांक १,२६,५१,७६ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असले तरी उक्त बिंदूवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांनी घ्यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदू वर काही कारणास्तव उमेदवाराचा

समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदूंचा सुयोग्य वापर करण्यात यावा. म्हणजेच एका गटात बिंदू राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढील गटात समावेश करणे आवश्यक राहील. १०० बिंदू नामावली पूर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदूपासून गणना सुरु करावी. बिंदू नामावलीचा नमुना “प्रपत्र अ” सोबत देण्यात आला आहे.

**८. दिव्यांगांसाठी आरक्षित पदे पुढील भरती वर्षात ओढणे व अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करणे** :-

(१) एखादया भरतीवर्षात विहीत दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलब्ध झाली नाही तर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात यावा. ती जागा इतर कोणत्याही उमेदवारांमधून भरण्यात येऊ नये. जर पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातून अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करावी. अंतर्गत परिवर्तनातून पद भरती करण्यात आल्यास आरक्षणाने पद भरण्यात आले असे समजावे. अंतर्गत परिवर्तनानेही सदर पद भरणे शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात यावे. वरीलप्रमाणे इतर पर्याय उपयोगात आणण्यासाठी पद भरतीची जाहिरात देतांना मागील वर्षातील अनुशेषाची पदे भरतांना सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनाने पद भरती करण्यात येईल व तेही शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधून भरण्यात येईल असे स्पष्टपणे नमूद करावे.

(२) प्रत्येक भरती वर्षात दिव्यांगांसाठी विहित आरक्षणानुसार पद भरतीमध्ये आरक्षण ठेवावे. असे करताना मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्यात व चालू भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील याबाबतचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

९. **दिव्यांग व्यक्तींचा समावेश** :- दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात येतात. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येतो. जसे अनुसूचित जाती किंवा जमातीचा असल्यास त्यासाठी विहित केलेल्या बिंदूवर समाविष्ठ करावे तसेच अनुसूचित जमातीचा उमेदवार असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदूवर त्याच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या बिंदूवर व उमेदवार खुला असल्यास खुल्याच्या बिंदूवर दर्शविण्यात यावा. परंतू जेव्हा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराची निवड झाल्यास व त्या प्रवर्गाचा बिंदू रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या प्रवर्गाच्या रिक्त होणाऱ्या बिंदूवर त्याचा समावेश करण्यात यावा. अन्य बिंदूवर त्याचा समावेश करण्यात येवू नये.

१०. **पात्र दिव्यांग उमेदवार उपलब्ध होत नसल्यास निकषात सुट देणे :-** दिव्यांगासाठी आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात

आलेल्या अटी व शर्तीमध्ये सुट देऊन करता येईल. परंतु असे करताना विहित अपंगत्वाच्या प्रमाणात कोणतीही सुट देता येणार नाही. सुट देण्यात आलेल्या अटी व शर्तीचा लाभ खुला व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखा देण्यात यावा.

**११. मागणीपत्र सादर करतांना निवड प्राधिकरणास सादर करावयाचे प्रमाणपत्र :-** दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करून पद भरती करण्यात यावी. यासाठी सोबत जोडलेल्या “प्रपत्र ब” मध्ये विहित नमुन्यात मागणीपत्र सादर करताना सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत करावे. तसेच प्रथम नियुक्तीच्या वेळी नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित उमेदवार दिव्यांगासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीत अपंगत्व असल्याची खात्री करून आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असल्याचीही खातरजमा करील.

१२. केंद्र शासनाने दि. १५.०१.२०१८ च्या कार्यालयीन आदेशात दिव्यांगांसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद ठेवलेली नाही. परंतु दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मध्ये संबंधित राज्य शासनास पदोन्नतीमध्ये आरक्षणाबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहेत. राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करत आले आहे. केंद्र शासनाने सन १९९८ मध्ये दिव्यांगांना गट क व ड च्या पदावर पदोन्नतीसाठी आरक्षण दिले होते. राज्य शासनाने त्याची अंमलबजावणी दिनांक ५/०३/२००२ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. तेव्हा गट क व ड च्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी उक्त तरतूद जशीच्या तशी सुरू राहतील. गट अ व ब च्या पदावरील पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या निर्णयानंतर यथावकाश घेण्यात येईल.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था व ज्यांना मार्गदर्शक सूचना देण्याचा अधिकार शासनास आहे अशा सर्व संस्था व सेवा यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१४४२२८४९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2019.05.29 14:59:30 +05'30'

**( टि.वा.करपते )**

**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२

२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई- ३२
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव (आस्थापना शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुबई-३२
१९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२०. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
२२. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
२३. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७. विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३०. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र अ**

दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या पद भरतीची माहिती ठेवण्यासाठी

बिंदूनामावलीचा विहित नमुना

| भरती वर्ष | पदाचे नाव | रोटेशन क्रमांक | बिंदू क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारांपैकी विहित दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चित करण्यात आलेले आहे काय | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारासाठी आरक्षित असेल तो गट नमूद करावा) | ज्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली त्याचे नाव व नियुक्तीचा दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ, ब, क, (ड व इ) मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | (ड व इ) | | | | |

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २८ मे, २०१९ सोबतचे सहपत्र)

**प्रपत्र – ब**

**मागणीपत्रासोबत सादर करण्याचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अंमलात आलेला आहे. त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अंमलबजावणीची काळजी घेवून हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे. सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदू क्रमांक --- वरील चक्री क्रमांक --- मधील १०० बिंदूनामावलीतील रोस्टरमधील ----- इतकी रिक्त पदे विहित दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहे.

सक्षम नियुक्ती प्राधिकारी